# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि २०/०४/२०१८ चे गुन्हे आढावा.

| अ. क्र | पोलीस ठाणे | गु र नं कलम | गु घ ता वेळ ठिकाण | गु दा ता वेळ | फिर्यादी | आरोपी | अटक ता. वेळ | गेलेला माल | मिळालेला माल | घ.भेटीचा दि. व अधि | तपास | खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ज. नगर | 58/18 कलम 354 (अ), 504, 506 भा.द.वि. सहकलम 7, 8 बा.लै.अ.सं अधिनियम | 27/1/18 रोजी 17.00 ते 18/4/18 रोजी 12.30 वा. पावेतो | 19/4/18 रोजी 01.15 वा. | अल्पवयीन पिडीता फिर्यादी, रा. औरंगाबाद | शशी राजेंद्र राऊत, रा. विष्णुनगर, औरंगाबाद | - | - | - | API / एस. एन. कांबळे, | API/ एस. एन. कांबळे, मो.नं. 9881532707 | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपीताने मागील चार महीण्यापासून फिर्यादीस मानसिक त्रास देवून फिर्यादी ही लहान बहीणी सोबत मैत्रीणीकडे जात असतांना पाठीमागून हात पकडून फिर्यादीचे मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून फिर्यादीस फोन का करत नाही असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून फिर्यादीचे वडील व काका यांना जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन बाजुस कलमा प्रमाणे गुन्हा दाखल. |
| २ | ज.नगर | 59/18 कलम 7(3), 20 प्रो. ऑफ अँडव्हरटाईजमेन्ट अँण्ड रेगुलेशन ऑफ ट्रेड अँण्ड कमरशीयन प्रोडक्शन सप्लायर अँण्ड डिस्ट्रीब्युटर अँक्ट 2003 | 19/4/18 रोजी 13.00 ते 13.15 वाजेच्या दरम्यान सुतगिरणी चौक ते शिवाजी नगर रोडवर औरगाबाद | 19/4/18 रोजी 22.27 वाजता | दिपक संतराम भालेराव वय- 38 वर्ष, रा.न्यु हनुमान नगर गारखेडा परिसर औरंगाबाद | वाजीदखान चॉंदखान पटेल रा. संग्रामनगर औरंगाबाद | - | - | | - | सपोनि बी.जी. वेव्हळ मो. 9850547880 | **मिळालेला माल-** 27,300 रु. किमंतीचे वेगवेगळया कंपनीचे विदेशी सिगारेटचे एकुण 68 बॉक्स<br><br>न.ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपीने आपले दुकानात वरील नमुद वर्णनाची सिगारेट पॉकीट विक्री व वितरण करीत कब्ज्यात बाळगुन असतांना व ज्या सिगारेट पॉकीटच्या दर्शनी रुंद भागावर विहीत केल्याप्रमाणे संविधानित धोक्याचा इशारा इंग्रजीत अथवा मान्यताप्राप्त भारतीय भाषेत छापलेला दिसुन आलेला नाही मिळुन आल्याने बाजुस कलमाप्रमाणे गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि २०/०४/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | छावणी | ६६/१८ कलम ३२४,३२३, ५०६,३४ भादवि | १९/४/१८ रोजी ०८.३० वा सु मिटमिटा औ बाद | १९/४/१८ रोजी २२.२० वा | नितीन भास्करराव खंडागळे वय २८ वर्षे रा.अंगुरी बाग औरंगाबाद | १) सचिन प्रभाकर खंडागळे २) प्रभाकर उत्तमराव खंडागळे ३) महिला आरोपी सर्व रा. मिटमिटा औरंगाबाद | | | | | पोहे/ ३९९ वामने | यातील फीर्यादी यांनी त्यांचे शेतात नांगरणी करने करीता ट्रॅक्टर आणला असता व ट्रॅक्टरचालक हा फिर्यादी यांचे शेतात नांगरणी करत असताना आ.क्र.१, २, ३ असे आले व म्हणाले की, तु तुझे ट्रॅक्टर दुसरीकडुन टाक तु येथे नांगरु नको असे म्हणुन यातील नमुद लोकांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन मारहान केली व प्रभाकर याने त्याचे हातातील काहीतरी वस्तु डाव्या हातावर मारुन जखमी केले आहे व तु जर शेतात ट्रॅक्टरने नांगरले तर तुला जीवे मारुन टाकु अशी धमकी दिली म्हणुन गून्हा दाखल |
| ४ | दौलताबाद | 47/18 कलम-379 भा.द.वि. | 11/4/18 चे 18.00 ते 12/4/18 चे 06.00 वा. फिर्यादीचे घरासमोर करोडी | 19/4/18 रोजी 13.00 वा. | हरिदास विठ्ठल जाधव वय 32 वर्ष रा.करोडी ता.जि. औरंगाबाद. | आज्ञात | | 18000- रु.किंची मो.सा.क्र. MH-20.EC 4303 HF डिलक्स कंपनीची | | | पोना 1866 पवार | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीने आपल्या मालकीची मो.सा.क्र MH-20 EC-4303HFडिलक्स उभी करुन ठेवली आसता ति कोन्हीतरी आज्ञात चोरट्याने बनावट चावी लाउन लबाडीच्या इराद्याने स्वत:च्या फायद्यासाठी चोरुन नेली म्हणुन गुन्हा दाखल. |
| ५ | वाळुज | ५८/२०१८ कलम ३७९. भा.द.वी | ०९/०४/१८ रोजी ०६.३० ते १०/०४/१८ चे ०६.०० वा. सु. लिंबे जळगाव ता. गंगापुर | १९/०४/२०१८ रोजी चे १६.०३ वा. सु. | रविंद्र दादासाहेब काळे , वय-२४ वर्ष रा. कोळघर ता. गंगापुर जि.औरंगाबाद | अज्ञात | | स्पेंन्डर प्लस मो.सायकल लाल रंगाची क्र. एम. एच २०. सी. के. २०४२ जुनी वापरती कि. अं. १५०००/- रु. | | | सफौ/ डी. एम. साठे | यातील फिर्यादी हे नेहमी प्रमाने कामावर लिंबेजळगाव येथे आले व मोटार सायकल ही कंपनीचे बाहेरील पार्कींग मध्ये हॅंडल लॉंक करुन उभी करुन फिर्यादी कंपनीत कामाला गेले सकाळी ड्युटी संपल्यावर मो. सा. लावलेल्या ठिकाणी येवुन पाहीले आले आसता आजु बाजुस व इतर ठिकाणी मो. सा. बराच शोध घेतला आसता ती मिळुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरीच्या व लबाडीच्या इराद्याने स्वत:च्या फायद्यासाठी चोरुन नेली आहे. म्हणुन गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि २०/०४/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | वाळुज | ५९/२०१८ कलम ३७९ भा.द.वी | १५/०३/१८ रोजी २३.५०ते १६/०३/१८ चे ०५.०० वा. सु. जिकठाण ता. गंगापुर | १९/०४/२०१८ रोजी चे १६.१२ वा. सु. | भगवान तेजराव कोंडके, वय-५७ वर्ष, धंदा- खा. नोकरी रा. शिनगर गादीया , विहार रोड गारखेडी परिसर औरंगाबाद | अनोळखी | | ८०,०००/-रु. किं. Corrsteels hee ७०५० ज्याची साईज २६१०, २६००, २८३०, २८००, ३४५० असे असलेले नविन पत्रे (९४ नग ) | | | सफौ/ डी. एम. साठे | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे मसकोर प्रेझीशन प्रा. लि. जिकठाण शिवीर गट नं. १५ मिरजापुर ता. गंगापुर येथे पर्सनल मँनेजर म्हणुन काम पाहतो व सध्या कंपनीचे बांधकाम चालु आसुन फिर्यादी त्यो देखरेखीची कामे पाहतात नमुद तारखेला फिर्यादी घरी आसतांना कंपनीचे बांधकामावरील वॉचमन यांचा फोन आला व कळविले की आपले कंपनीतुन नविन बांधकामाचे पत्रे चोरी गेले आहे. फिर्यादी सदर ठिकाणी गेले असता त्यांना नमुद पत्रे तेथे दिसुन आली नाही ते नमुद पत्रे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरीच्या व लबाडीच्या इराद्याने स्वत:च्या फायद्यासाठी चोरुन नेली आहे. करिता वरील प्रमाने गुन्हा दाखल.. |
| ७ | एम वाळुज | 117/18 कलम 302,201 भादवी | 18/04/2018 रोजी 00.00 ते 07.30 वा.जोगेश्वरी एक्संलंट कंपनी च्या पाठीमागे ता.गंगापुर जि. औरंगाबाद | 19/04/18 रोजी 15.13 वा | पोनि/ ज्ञानेश्वर दशरथ साबळे वय 46 वर्ष ने.पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. ता.जि. औरंगाबाद | अज्ञात | | | | | पो.उप. नि./ उंबरे | सादर कि, यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी पोनि/ ज्ञानेश्वर दशरथ साबळे यांनी फिर्याद दिली कि, मौजे जोगेश्वरी एक्संलट कंपनीच्या पाठीमागे एक अनोळखी महिला हि बेशुध्द अवस्थेत पडली असल्याची माहिती नियंत्रण कक्ष येथुन मिळाली असता फिर्यादी यांनी घटनास्थळी जावुन बघितले असता एक अनोळखी महिला वय अंदाजे 35 वर्ष हि बेशुध्द अवस्थेत पडलेली दिसुन आली. आम्ही टु मोबाईलच्या स्टाफच्या मदतीने घाटी दवाखाना औरंगाबाद येथे अपघात विभाग दाखल केले असता मा. सी.एम.ओ. सो यांनी सागिंतले कि, सदर महिलेचा गळा आवळुन खुन केला असुन पुरावा नष्ट केला आहे. म्हणुन गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि २०/०४/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | एम वाळुज | 118/18 कलम 379 भादवी | 12/04/18 रोजी 07.00 ते 19.00 वा केशर दिप प्रेसिग बी-21 एम वाळुज या कंपनीत | 19/04/18 रोजी 23.05 वा | फिरोज इब्राहीम शेख वय 25 वर्ष रा.बकवाल नगर, वाळुज औरंगाबाद | अज्ञात | | 30,000/- रू कि ची हीरो कंपनीची एच एच डीलक्स गाडी क्र एम एच -20-डी एस 6612 | | | पोह/ 249 अंतरप | सादर कि वरिल वर्णनाची व कि मोसा कुणीतरी अज्ञात व्यक्तीने स्वत:च्या फायद्यासाठी लबाडीच्या ईराद्याने चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल. |
| ९ | सातारा | 138/18 कलम 379 भादवी | 19/04/2018रोजीचे 00.30ते सकाळी 05.00वा.स फिर्यादीच्या घरासमोरुन | 19/04/2018 रोजी 11.13 वा. | अशोक मल्कअर्जुनअप्पा विभुते वय 55वर्ष रा.नक्षत्रवाडी औरंगाबाद | अज्ञात | | 45,000/- रु.किं. पॅसेन्जर ऑटो रिक्षा क्र MH-20-BT- 8656 | | | | नमुद.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी त्यांची बजाज कंपनीची पॅसेन्जर ऑटो रिक्षा क्र MH-20-BT-8656 ही त्यांच्या घरा समोर ऊभी केली असताना आज रोजी ती कोणीतरी अज्ञात चोरट्याने स्वत:च्या फायद्यासाठी लबाडीच्या इराद्याने चोरुन नेली आहे म्हणुन गुन्हा दाखल |
| १० | क्रांती चौक | 129/2018 कलम 342,427 भादवी | 18/04/2018 रोजी दुपारी 04.30 ते 05.30 वाजे दरम्यान सिल्लेखाना औरंगाबाद. | 19/4/2018 रोजी 12.48 वा. | महिला फिर्यादी वय-32वर्षे, रा. सिल्लेखाना औरंगाबाद. | जहिर अब्बास कुरेशी रा. सिल्लेखाना औरंगाबाद | | | | | पोहवा 583 कडु मो.नं-9823654583 | यातील फिर्यादी व आरोपी यांच्यात नेहमी भांडण होत असल्याने फिर्यादी हे त्याचे घरास कुलुप लावुन दुसरीकडे किरायाने राहतात व ते अधुन मधुन त्याचे घराची साफ सफाई करण्यासाठी येत असतात नमुद वेळी यातील फिर्यादी हे त्याचे घराचे साफसफाई करण्यासाठी गेले असता आरोपी यांने फिर्यादीचे घराचा दरवाजा तोडुन नुकसान केले व फिर्यादी हे आत साफ सफाई करत असतांना आरोपी यांने घराचा दरवाजा बाहेरुन बंद केला व त्याला कुलुप लावुन फिर्यादीस आत डाबुन ठेवले. वगैरे मजकुराची तक्रारी वरुन गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि २०/०४/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | एम सिडको | 86/18 कलम 279,337, 338 भा.द.वी व सह कलम 134 मो.वा. कायदा | 14/04/18 रोजी 06.30 वा . फोरबीस कंपनि समोरुन रामनगर कमानी समोर जालना रोड वर औ.बाद | 19/04/18 रोजी 13.07 वा. | भिमराव रामजी साळवे वय50वर्षे रा. चौधरी काँलनी चिखलठाणा औरंगाबाद | कार क्र MH 20 DU 2461 होंडा चे चालक अशोक जोंधळे, पत्ता माहीत नाही | | | | | स.फौ/ ज्ञानेश्वर शिंदे | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे स्कुटी क्र MH 20 EA 8355 हिच्यावर बसुन मुकुंदवाडी समोरुन फोरबीस कंपनी रामनगर कंमानि समोरुन जात असताना यातील कार क्र. MH 20 DU 2461 होंडा च्या चालकाने त्याच्या ताब्यातील कार हि भरधाव वेगाने हयगईने व निष्काळजीपणाने चालवुन यातील फिर्यादीच्या स्कुटीला जोराची धडक देवुन गंभीर जखमी केले व सदर जखमीस मदत न करता घटना स्थळावरुन कार घेवुन पळुन गेले म्हणुन गुन्हा दाखल. |
| १२ | एम सिडको | 87/18 कलम 379 भा.द.वी | 18/04/2018 रोजी 09.00 वाजेच्या सुमारास जिमखाना येथील पार्किंग मध्ये औरंगाबाद | 19/04/18 रोजी 13.59 वा. | महिला फिर्यादी वय 30 वर्ष रा. नंदनंवन काँलनी औरंगाबाद. | अज्ञात | | 85000/- रोख रक्कम व मोबाईल असे एकुन 95000 | | | स.फौ/ पुर्ण पात्रे | . नमुद तारीख वेळी व ठिकाणी कोणी तरी अज्ञात आरोपीने यातील फिर्यादी याचे गाडीचे काच फोडुन गाडी मधील 95000/- रुपयाचा एवज स्वत:च्या फायद्यासाठी लबाडीच्या इराद्याने चोरुन नेला म्हणुन बाजुस प्रमाणे गुन्हा दाखल |
| १३ | एम सिडको | 88/18 कलम 304(अ), 337,338, 279 भा.द.वी. व सह .134 मो.वा.कायदा | 18/04/2018 रोजी सायकाळी 7.30वाजेच्या टायनी इंडस्टीज समोर रोडवर MIDC चिकलठाणा औरंगाबाद. | 19/04/18 रोजी 14.59 वा. | तरुन बिपीन उपल वय34वर्ष रा .फ्लेविंगो , MIDC चिकलठाणा औरंगाबाद | मो.सा. क्र MH 20. EH 1721 चालक | | | | | पोउप नि/ पवन इंगळे | - नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील मो.सा. क्र MH 20. EH 1721च्या चालकाने त्याचे ताब्यातील मो.सा ही भरधाव वेगाने व हायगीयने व निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीच्या वडीलाचे मो सा ला जोराची धडक देउन त्यांचे मरणास कारणीभुत झाला व तेथुन अपघाताची माहीती न देता पळुन गेला म्हणुन बाजुस प्रमाणे गुन्हा दाखल. |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि २०/०४/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | एम सिडको | 89/2018 कलम 353,504, 506,34 भादवी | 19/04/2018 रोजी 21.45 वाजता सिडको बसस्थानक औरंगाबाद. | 19/04/18 रोजी 23.18 वा. | पाशा रसुल शेख वय – 56 वर्ष व्यवसाय – S.T.बस चालक,रा- मु.पो. मोहा,ता-कळंब जि-उस्मानाबाद | 1)अनिरुध्द रामराव धर्मपुरीकर वय -39 वर्ष रा- गादीया विहार औऱंगाबाद, 2) किरण अरुन ओझरकर वय - 37 वर्ष रा-जालना | | | | | पोना/ 1055 शेजुळ | यातिल फिर्यादी यांनी औरंगाबाद येथुन इचलकरंजी जाण्यासाठी गाडी प्लँट फार्म नं.1वर गाडी लावली असता नमुद आरोपी गाडी मध्ये चढले व फिर्यादीस म्हणाले कि, ही बस पंढरपुर ला केंव्हा पोहचेल फिर्यादी त्यांना म्हणाले 8 ते 9 तास लागतात त्यावर ते म्हणाले ऐवढा वेळ कसा लागतो असे म्हणुन आरोपीने फिर्यादीस अरेरावीची भाषा करुन शिविगाळ करुन फिर्यादीचे अंगावर धावुन आले.त्यावेळी फिर्यादीचे सोबतचे वाहक आरोपींना समजावात असतांना त्यांना सुध्दा त्यांनी शिविगाळ केली. व फिर्यादीस म्हणाले कि, तु गाडी कशी पुढे नेतो असे म्हणुन कॉलर धरुन ओढुन फिर्यादीस सरकारी काम करण्यास अडथळा निर्माण करुन शिविगाळ करुन धमकी दिली.म्हणुन गुन्हा दाखल |
| १५ | सिडको | 124/18 कलम 498 (A), 323, 504, 506, 34 भादवी | 01/08/2011 पासुन दिनांक 19/04/2018 पावेतो, मिसारवाडी औरंगाबाद | 19/4/18 रोजी 15.16 वा. | महिला फिर्यादी वय 34 वर्षे रा. मिसारवाडी औरंगाबाद | 1)बाळासाहेब तानाजी सिरसाठ 2) महिला आरोपी रा. मिसारवाडी औरंगाबाद 3) महिला आरोपी रा.शास्त्री नगर, शिवाई नगर ठाणे 4) महिला आरोपी रा. वरशी ता. वरशी जि. धुळे | | | | | HC/ 14 जाधव मो.नं.98 23643737 | नमुद ता.वेळ व ठिकाणी यातील आरोपीतांनी फिर्यादीचा शारीरीक व मानसिक छळ करुन व पक्के घराचे बांधकाम करण्यासाठी तिन लाख रुपयाची मागणी करुन शिवीगाळ करुन हाताचापटाने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल . |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि २०/०४/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | सिडको | 125/18 कलम 294 (B), 323, 504,506, 34 भादवी | 19/04/18 रोजी 19.30 वा. सुमारास, फिर्यादीचे घरासमोर, , औरंगाबाद | 19/4/18 रोजी 22.42 वा | शेख कलीम शेख इमाम वय 32वर्ष रा. मिसारवाडी, औरंगाबाद. | 1) अशोक सखाराम मुळे वय 46 वर्षे 2) महिला आरोपी वय 40 वर्षे दोन्ही रा. मिसारवाडी ,औरंगाबाद | | | | | पोह/ 205 हिवाळे मो.नं. 79723 049 78 | यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यातील राहणारे असुन वरील ता. वेळी ठिकाणी यातील आरोपींचा मुलगा हा बिडी पीत जात असल्याने फिर्यादीने त्यास ," तु इतना छोटा होकर बिडी क्यो पिता है?" असे म्हणुन त्यास प्रेमाने एक चापट मारली असता यातील आरोपीतांनी संगणमत करुन घटनास्थळी येऊन फिर्यादीस,"आमच्या लहान मुलास का मारले ?' असे म्हणुन फिर्यादीस शिविगाळ करुन झटापट करुन हाताचापटाने मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपी क्र.01याने फिर्यादीची पत्नी हिस अशी अश्लिल शिविगाळ केली म्हणुन गुन्हा दाखल |
| १७ | सिडको | 126/18 कलम 324,323, 504,506, 34, भादवी | 19/04/18 रोजी 19.30 वा. सुमारास, आरोपीचे घरासमोर, औरंगाबाद | 19/4/18 रोजी 23.57 वा | अशोक सखाराम मुळे वय 46वर्ष रा. मिसारवाडी, औरंगाबाद | 1) शेख कलीम शेख इमाम वय अंदाजे 32वर्ष 2) महिला आरोपी वय 28 वर्ष व त्यांचा एक साथीदार नाव पत्ता माहित नाही. दोन्ही रा.मिसारवाडी, | | | | | पोह/ 1853 जरारे मो.नं. 82081 430 71 | यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहणारे असुन वरील ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र.1 याने फिर्यादीचा मुलगा यास बिडी का पितो असे म्हणुन तोंडात मारल्यावर फिर्यादी व त्याची पत्नी हे विचारण्यास गेले असता आरोपीतांनी संगणमतकरुन फिर्यादीस व तीच्या पत्नीस शिविगाळ करुन हाताचापटाने मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिला व आरोपी क्र.1याने फिर्यादीच्या डोक्यात काहितरी धारदार वस्तुने मारुन डोके फोडुन गंभार जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि २०/०४/२०१८ चे गुन्हे आढावा.

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | मुकूंद वाडी | १०६/१८ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि | १८/०४/१८ रोजी १६.०० ते १९/४/१८ रोजी ०२.३० वा | १९/०४/१८ रोजी १९.४८ वा | महिला फिर्यादी वय 25 वर्ष. रा. एस.टी. कॉलनी मुकुंदवाडी औरंगाबाद | अज्ञात | --- | 1)20,000/रु. एक सोन्याचे नेकलेस 2)10,000/ रु.एक सोन्याचे मणीमंगळसुत्र 3) 10,000/ रु.एक हुडाई कंपनीचा LED-TV 4) 10,000/रु. रोख असे एकुण-50,000/ रुपये. | – | | पोउपनि बन-सोड ९६५७७१९२९५ | यातील नमूद वर्णन व किमंतीचा ऐवज व रोख रक्कम अज्ञात चोरट्याने दि. 18/04/2018 रोजी 16.00 ते 02.30 वा.सुमारास बंद घराच्या दरवाज्याचे कुलुप कोंडा तोडुन आत प्रवेश करुन लबाडीच्या इराद्याने चोरुन नेला आहे म्हणुन गुन्हा दाखल. |

**स्वाक्षरीत/-**
**(रामेश्वर थोरात)**
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर.